नि.फौ.ख.क्र.६५/२०२४
सरकार / जितेंद्र
नि.क्र. १२

**सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. १ ची जबानी,**

**मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,**

माझे नांव : शामलाल बुधराम मेश्राम
वय : ५३ वर्षे, कामधंदा : शेती
राहणार : सरकारटोला, ता.आमगांव, जि.गोंदिया

**सरकार तर्फे सहा. सरकारी अभीयोक्ता श्री आर.डब्ल्यु बोरकर यांच्या मार्फत साक्षदाराचा सरतपास शपथेवर सुरु**

१. मी आरोपींना ओळखतो. ते आजरोजी न्यायालयात हजर नाहीत. पोलीसांनी मला घटनास्थळ पंचनामा करण्याकरीता बोलवले नव्हते. पोलीसांनी माझ्या समक्ष घटनास्थळ पंचनामा केला नाही. आता मला पंचनामा दाखवला. त्यावर माझी स्वाक्षरी आहे. परंतु पंचनाम्यामधील मजकूर काय आहे हे मला माहिती नाही. **स्वाक्षरी पुरती निशाणी १३** देण्यात येते.

२. पोलीसांनी मला जप्ती पंचनामा करण्याकरीता बोलाविले नव्हते. आता मला जप्ती पंचनामा दाखविला. त्यावर माझी स्वाक्षरी आहे. परंतु पंचनाम्यामधील मजकूर काय आहे हे मला माहिती नाही. **स्वाक्षरी पुरती निशाणी १४** देण्यात येते.

**[साक्षदार अभियोग पक्षाला सहकार्य करीत नसल्याने सरकारी वकीलांनी उलटतपासात विचारता येण्याजोगे प्रश्न विचारण्याची परवानगी मागीतली - परवानगी देण्यात येते. ]**

२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २९.१२.२०२३ रोजी पोलीसांनी मला घटनास्थळ व जप्ती पंचनामा करण्याकरीता बोलवले होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी दोन्ही पंचनामे माझे समक्ष केले व मला वाचून दाखवले व ते बरोबर असल्याने मी त्यावर स्वाक्षरी केली. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पुर्ण**

**उलटतपास आरोपी तर्फे विधीज्ञ श्री आर. डी. लिल्हारे यांच्या मार्फत-**

उलटतपास नाकारला.

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृत**

**आमगांव** **(समीर गोपाळ गुणारी)**

**दिनांक : ०३/०९/२०२५** **न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, आमगांव**